# वेदान्तातील काही प्रक्रियांचे स्पष्टीकरण

**अध्यारोप-अपवाद** -

(जग) प्रपंच नावाची काही वस्तूच अस्तित्वात नाही, आहे ते 'एकमेवाद्वितीय सत्यंज्ञानमनन्तं ब्रह्म।'. परंतु मंद व मध्यम अधिकाऱ्याची झेप या विचारापुरती नसते. त्यांनाही ब्रह्मज्ञान करविण्यासाठी अध्यारोप-अपवाद पद्धती आहे. 'अध्यारोपापवादाभ्यां निष्प्रपंचं प्रपंच्यते।'
<u>अध्यारोप</u> - एखादी वस्तू जशी नाही तशी ती आहे अशी कल्पना करणे, समजणे म्हणजे त्या वस्तूवर आरोप करणे होय. जगाची प्रतीती येते म्हणून हा दृश्य प्रपंच आत्म्यापासून झाला असे उपनिषद् सांगते. 'आनंदात् हि एव खलु इमानि भूतानि जायन्ते...' वगैरे. निष्प्रपंच आत्म्यापासून हे कसे शक्य? म्हणून ही केवळ कल्पना, आत्म्यावर हा आरोप होय. आत्म्यावर जगाचा आरोप करणे (तेथे नसलेले जग कल्पिणे) हा अध्यारोप. पुढे लयचिंतन, अन्वय-व्यतिरेक इ. रीतींनी अभ्यास करून शुद्ध बुद्धीने युक्ती, अनुभव, शास्त्र द्वारा दृश्य जगाचा निरास करणे म्हणजे <u>अपवाद</u> करणे (नाही असे मत निश्चित करणे) होय. अध्यारोपाचा निरास = अपवाद.

**अन्वय-व्यतिरेक** -

जीवब्रह्मैक्य व जगन्मिथ्यात्व समजून घेण्यास अन्वय-व्यतिरेक पद्धती फार उपयुक्त आहे.
<u>अन्वय</u> - सोबतीने चालणे, प्रविष्ट असणे, अनुगत होणे. अन्वय या शब्दातील घटक शब्द - अनु (मागोमाग, सोबत, न सोडता)इ. (जाणे). अर्थ होतो संगती न सोडता असणे, सोबतीने राहणे, प्रविष्ट होऊन असणे.
<u>व्यतिरेक</u> - वेगळे पडणे, स्वकारणाहून वेगळे पडणे. व्यतिरेक या शब्दातील घटक शब्द - वि, अति, रिच्। यांचा अर्थ होतो - रिकामे करणे, रहित करणे, विभक्त करणे, वियुक्त करणे.
अ) 'कार्य असता कारण असतेच व कारण नसता कार्य नसतेच' हाच विचार अन्वय-व्यतिरेक पद्धतीचा आहे. येथे कारण म्हणजे उपादान कारण समजावे.

कार्यात कारणाचा अन्वय असतो. घट या कार्यात माती हे कारण असतेच. घटाचे असणे पूर्णपणे मातीच्या असण्यावर (सत्तेवर) अवलंबून आहे. मृत्तिका नसताना घट नसतोच. परंतु घट असला काय व नसला काय माती असतेच. घट या कार्यावर माती या कारणाचे असणेपण अवलंबून नाही, घट या कार्याचा माती या कारणात व्यतिरेक आहे. या प्रमाणे ज्याचा (कारणाचा) अन्वय त्याची स्वतंत्र सत्ता व ज्याचा (कार्याचा) व्यतिरेक असतो त्याची परतंत्र सत्ता असते.

जग हे कार्य परतंत्र सत्तावान आहे व त्याचे ईश्वर (वा ब्रह्म) हे कारण स्वतंत्र सत्तावान आहे. 'मत्स्थानि सर्व भूतानि न चाहं तेष्ववस्थित:।' जग हे ईश्वराचे कार्य आहे. ईश्वर (किंवा

ब्रह्म), जीव (मी), जगत् व ईश्वर यांचा अभ्यास करताना जीव काय काय नाही हे प्रथम ठरवावे. हे प्रथम ठरविणे हा व्यतिरेक अभ्यास आहे. नंतर जीव काय आहे हे निश्चित करावे. हा अन्वयाचा अभ्यास. प्रथम भेद सिद्ध करून घेणे व नंतर ऐक्याचा निश्चय करणे, दोन्ही मिळून पूर्ण अभ्यास होतो.

ब) जोवर आपल्याहून भिन्न जग भासते तोवर द्रष्टा-दृश्य भेद. जोवर असा भेद तोवर दुःख. जोवर दुःख तोवर ब्रह्मज्ञानाची अपूर्णता. सर्व जग मीच असे द्रष्टा-दृश्य यांचे ऐक्य पाहणारी दृष्टी म्हणजे अन्वय बोध. द्रष्टा मी चैतन्यरूप व दृश्य जग जड, त्याहून भिन्न हा समज म्हणजे व्यतिरेक बोध. दोन्ही बोध मिळून पूर्ण ज्ञान.

लाकडी हत्ती पाहताना प्रथम हत्ती हे नामरूप व त्याच्या अस्तित्वाला जबाबदार लाकूड भिन्न दिसतात. हा समज हत्तीचा व्यतिरेक बोध. नंतर सूक्ष्मपणे पाहिल्यावर तेथे लाकडाशिवाय काही नाही हे कळणे हा अन्वय बोध. प्रथम आत्मा व जग यांची विलक्षणता ओळखणे ही व्यतिरेक रीत व नंतर आत्म्याशिवाय अन्य काही नाही हे जाणणे ही अन्वय रीत. नामरूप भाग मिथ्या - नाममात्र व त्याचाच व्यतिरेक. सत्तारूप अधिष्ठान सत्य. त्याचा नित्य अन्वय.

क) जे सर्वत्र व सदा असते त्याचा अन्वय. जे कोठे कोठे व कधी कधी असते त्याचा व्यतिरेक, स्वप्नात जागृती नाही, सुषुप्तीत स्वप्न-जागृती नाही वगैरे. ही वस्तुस्थिती म्हणजे या अवस्थांचा एकमेकीत व्यतिरेक, त्यांचा साक्षी आत्मा सर्व अवस्थांमध्ये असल्याने त्याचा त्या अवस्थांमध्ये अन्वय, दृश्य विश्व सर्व अवस्थांमध्ये नसते. त्याचे अधिष्ठान आत्मा मात्र असतो. या वस्तुस्थिती अनुक्रमे व्यतिरेक व अन्वय.

आत्मा, मी व जग यांची अभिन्नता कळणे ही अन्वयदृष्टी. उदाहरणे - दुःख तोवर शरीर परिग्रह. शरीर परिग्रह नाही, दुःख नाही. शरीर परिग्रहाचा अन्वय. - वासना तोवरच जन्म, वासना नाही तेव्हा जन्म नाही. वासनेचा अन्वय. व्यतिरेक अभ्यासाने विरक्त व्हावे, अन्वय अभ्यासाने सुखी व्हावे.

**अविनाभाव संबंध -**

दोन पदार्थांमध्ये अभिन्नता, संबंध नाही असे कधी होत नाही. स्वभावसिद्धता. उदा. गाय व गोत्व. (धर्म व धर्मी यांचा कायमचा संबंध आहे.) Inseparable relation.

**अज्ञान -**

मायेचेच दुसरे नाव अज्ञान आहे. अज्ञानालाच तम, सुषुप्ती, अविद्या असेही म्हटतात. काही ठिकाणी माया म्हणजे ज्ञानशक्ती व अज्ञान म्हणजे अविद्याशक्ती असेही म्हटले आहे. अज्ञानाविषयी

उत्तम, मध्यम व कनिष्ठ अधिकाऱ्याला वेगवेगळ्या पद्धतीने बोध केला जातो. ज्ञानाने अज्ञानाचा नाश होतो.

जे सत् आहे किंवा असत् आहे असे सांगता येते नाही ते अज्ञान व म्हणून त्याला अनिर्वचनीय असेही म्हणतात. हे त्रिगुणात्मक असून अनादि व भावरूप आहे. अज्ञान हे जगाचे कारण आहे. त्याच्या तीन शक्ती आहेत.

१) <u>आवरणशक्ती</u> – हिलाच मूळ अज्ञान म्हणतात. स्वरूपावर ही आवरण घालते म्हणजे स्वरूपज्ञान होऊ देत नाही. ही तमोगुणप्रधान आहे. तमोगुणामुळे स्वरूप कळेनासे होते, मोह निर्माण होतो व जग भासू लागते. हिच्यामुळे –

२) <u>विक्षेपशक्ती</u> – रजोगुणप्रधान. मूळ स्वरूप न कळल्याने तेथे भेदाने भरलेले जग दिसू लागते. देहादी पदार्थांच्या ठिकाणी मी–माझे अशी बुद्धी म्हणजे विक्षेप भासू लागतो. आकाशादी प्रपंचाच्या उत्पत्तीचे, भेदाचे हे कारण आहे. विक्षेपामुळे होणाऱ्या मी–माझे व जगत्सत्यत्व यांच्यामुळे मल नावाचा दोष येतो. म्हणजे स्वार्थासाठी निषिद्ध कर्मे करण्याची इच्छा होते. यातून सोडविणारी ती –

३) <u>ज्ञानशक्ती</u> – ही सत्त्वगुणप्रधान असल्याने ज्ञान होण्यास व टिकण्यास मदत करते. ईश्वराची उपाधी जी माया ती शुद्धसत्त्वगुणी असल्याने ती ईश्वराला मोहित करत नाही. त्यामुळे ईश्वर नित्यज्ञानी, नित्यमुक्त म्हटला जातो. जीवाच्या बाबतीत ती रज–तम मिश्रित असल्याने मोह होतो व भेद त्याला सत्य वाटतो. ज्ञानशक्तीमुळे तो मोह घालवू शकतो.

**कर्ता –**

कार्याच्या उपादान कारणाचे प्रत्यक्ष ज्ञान असून ते कार्य करण्याची इच्छा असणारा व त्यानुसार प्रयत्न करणारा.

**बाध –**

विश्वाचे अधिष्ठान ब्रह्मचैतन्य आहे. अधिष्ठान ब्रह्माचे अज्ञान असल्यामुळे ते सृष्टीरूप प्रतीत होते. त्या अधिष्ठानाचे ज्ञान झाले असता (म्हणजेच सृष्टीचे कारण जे अज्ञान ते गेले असता) सृष्टी केवळ प्रतीतिमात्र म्हणजे मिथ्या आहे असा निश्चय होतो. म्हणजे तिचा सत्यत्वाने अभावच ठरतो. याप्रमाणे पदार्थ (सृष्टी) दिसत असूनही त्याबद्दल दृढ मिथ्यात्व निश्चय होणे हा त्या पदार्थाचा बाध होय वा तो पदार्थ बाधित होय. बाध हा एकप्रकारे नाशच आहे.

वरील विवेचनावरून ध्यानात येते की, अधिष्ठानाच्या (ब्रह्माच्या) वास्तविक स्वरूपाचा साक्षात्कार (ज्ञान) झाला असता कार्याचा (सृष्टीचा) उपादान कारणासह (अज्ञानासह) जो नाश तो त्या कार्याचा बाध होय. ज्ञानाने बाधित झालेल्या सृष्टीत ज्ञानी पुरुष साक्षीभावाने सर्व व्यवहार

करतो. व्यवहारापासून त्याला हर्षविषाद होत नाहीत.

**कूटस्थ –**

ब्रह्माच्या जेवढ्या भागावर व्यष्टिअज्ञान असते तेवढ्या भागासच कूटस्थ म्हणतात. (एका व्यक्तीपुरता व्यापक ब्रह्माचा जेवढा कल्पित अंश तोच कूटस्थ) म्हणून व्यापक ब्रह्म चैतन्य आणि कूटस्थ यांचा नित्य अभेद आहे. (त्या दोन्हीत मुख्य समानाधिकरण असते)

जीव चैतन्य म्हणून जे चैतन्य आहे, ते कूटस्थ चैतन्याचा बुद्धीतील आभास (प्रतिबिंब) आहे. कूटस्थाचे लक्षण 'बुद्धीचे अधिष्ठान चैतन्य (बुद्ध्यधिष्ठान)' असे केले आहे. हा आभास आरशातील प्रतिबिंबासमान नसून दीपाच्या सान्निध्यात एखादा स्फटिक जसा पूर्ण प्रकाशित दिसतो तसा आहे.

'कूटवत् निर्विकारेण स्थित: इति कूटस्थ:।' अशी कूटस्थाची व्याख्या केली जाते. कूट म्हणजे सोनाराची ऐरण, राशी. एवढ्या वर्णनावरून ध्यानात येते की कूटस्थ, बुद्धी व बुद्धीतील कूटस्थाचा आभास या तीन घटकांचा मेळा म्हणजे जीव होय. जीवाला चिदाभास ही म्हणतात.

कूटस्थ आत्मरूप व जीव अहंकाररूप आहे. स्व/स्वयं हे शब्द कूटस्थ वाची व अहं (मी) हा शब्द जीव वाची आहे. कूटस्थ सुखदु:खांचा साक्षी आहे तर जीव त्यांचा भोक्ता आहे. सुषुप्तीत बुद्धिवृत्तीच्या अभावाला प्रकाशित करणारा प्रकाश कूटस्थाचाच असतो. जागृतीत दोन वृत्तींच्या संधीतही त्याचाच प्रकाश असतो.

**प्रक्रिया –**

रीत, पद्धत, प्रकार, रचना. येथे वेदान्तातील जीव व ब्रह्म एकरूप आहेत हा बुद्धीचा निश्चय व्हावा यासाठी बसवून दिलेल्या काही पद्धती मांडलेल्या आहेत.

**प्रतिपत्ती –**

ज्ञान.

**प्रमा –**

यथार्थतेने जाणणे, मापणे, आवांका ओळखणे या अर्थाच्या 'मा' या धातूपासून प्रमा हा शब्द बनला आहे म्हणून प्रमा म्हणजे यथार्थ ज्ञान. प्रमाणांपासून निर्माण झालेले व व्यवहारात अबाधित ठरणारे ज्ञान. म्हणजे पदार्थ जसा आहे तसा जाणणे हे प्रमेचे स्वरूप आहे. ज्ञानेंद्रिये ही प्रत्यक्ष प्रमेची साधने आहेत व प्रत्यक्ष प्रमाणावरच इतर सर्व प्रमाणे आधारलेली आहेत.

अप्रमा ज्ञान असेही ज्ञान असते. प्रमाणांच्या साह्याने न होणारे ज्ञान. उदाहरणार्थ सुखाचे अथवा दु:खाचे ज्ञान हे कोणत्याही प्रमाणावाचून अंत:करणाला होते. याला अंत:करणाचे ज्ञान म्हणतात. यातील अंत:करणाच्या ज्ञानाला यथार्थ अप्रमा व भ्रमज्ञानाला अयथार्थ अप्रमा अथवा साक्षीचे ज्ञान असे म्हणतात. वास्तविक सर्व ज्ञान हे साक्षीचेच असते. पण फरक लक्षात यावा या दृष्टीने भ्रमज्ञानाच्या बाबतीत 'साक्षीचे ज्ञान' असा शब्दप्रयोग करण्याची शास्त्रकारांनी बसवून दिलेली पद्धत आहे.

**प्रमाता** –

ज्याला ज्ञान होते तो. जीव प्रमाता आहे. शास्त्रीय भाषेत प्रमाता म्हणजे अंत:करणवृत्तीने मर्यादित केलेले (अंत:करणोपहित) चैतन्य. जीवाला प्रमातृधर्म येण्यासाठी अंत:करणावर आत्म्याचा तादात्म्याधास आणि इंद्रिये, देह इत्यादिकांवर 'ही माझी' असा संसर्गाध्यास व्हावा लागतो. असे झाल्यावर 'माझ्या इंद्रियाने मला अमुक ज्ञान झाले' असे ज्ञान व त्यानुसार व्यवहार होऊ लागतो.

**प्रमाण** –

प्रमेच्या साधनाला प्रमाण म्हणतात. लौकिक व्यवहारात नऊ प्रमाणांचा उपयोग साधारणपणे केला जातो. पण या प्रमाणांनी ब्रह्मज्ञान होऊ शकत नाही.

१.प्रत्यक्ष २.अनुमान ३.शब्द ४.उपमान ५.अर्थापत्ती ६.अनुपलब्धी ७.शक्य ८.ऐतिह्य व ९.चेष्टा

१) <u>प्रत्यक्ष</u> – इंद्रिय द्वारा साक्षात् अनुभव घेणे व याहून अन्य मार्गाने जे जे कळते ते ते सर्व खोटे मानणे असे या प्रमाणाचे स्वरूप आहे. ब्रह्म कोणत्याही इंद्रियाने अनुभवता येत नसल्याने ब्रह्मज्ञानासाठी या प्रमाणाचा उपयोग नाही.

चार्वाक फक्त प्रत्यक्ष प्रमाण मानतात.

२) <u>अनुमान</u> – केवळ प्रत्यक्ष प्रमाणानेच सर्व व्यवहार चालत नाही. म्हणून अन्य प्रमाणांची आवश्यकता भासते. पूर्व अनुभवावरून भविष्यकालीन अनुभवाचे भाकित करणे हे या प्रमाणाचे स्वरूप आहे. जसे काल जेवलो तेव्हा तृप्ती मिळाली त्याप्रमाणे आज जेवल्याने तृप्ती मिळेल, असे ठरवून तृप्तीसाठी मनुष्य आज जेवतो. श्रीगुरूंच्या अनुग्रहाशिवाय व त्यांच्या सांगण्याप्रमाणे साधन केल्याशिवाय ब्रह्मज्ञान होत नाही. जीवब्रह्मैक्य ज्ञानाचा निश्चय होण्यासाठी (प्रत्यक्ष ज्ञानासाठी नाही) या प्रमाणाचा उपयोग निश्चित आहे.

या ग्रंथात अनुमान प्रमाण उर्फ तर्क याचा उल्लेख अनेक ठिकाणी आहे. यासाठी नैय्यायिकांची तर्काची पद्धत दिली जात आहे. –

पंचावयवी तर्क ही पद्धत प्रसिद्ध आहे. ते पाच अवयव असे –

१. प्रतिज्ञा – जी गोष्ट सिद्ध करावयाची ती. उदा. पर्वतावर अग्नी आहे.

२. हेतू – म्हणजे कारण. अग्नी आहे कारण तेथे धूर दिसतो. धूर अग्नीशिवाय असू शकत नाही ही धुरात अग्नीची व्याप्ती झाली. त्यांचे कायमचे सहचर्य येथे दिसते.

३. उदाहरण – ही व्याप्ती दाखविण्यास दोन्ही पक्षांना पटेल असे उदाहरण द्यावे लागते. स्वयंपाकघरात पूर्वी चूल पेटवत असत. तेथे अग्नीबरोबर धूर हा असेच म्हणून स्वयंपाकघराचे उदाहरण आहे.

४. उपनय – म्हणून – तसेच येथे.

५. निगमन – पर्वतावर अग्नी असला पाहिजे. ही प्रतिज्ञेची सिद्धी झाली.

अनुमानाने जीवब्रह्मैक्य सिद्धी अशी –

१. प्रतिज्ञा – जीव व ब्रह्म एकच आहेत.

२. हेतू – कारण ते दोन्ही सच्चिदानंदरूप आहेत. (गीतेमध्ये अनेक ठिकाणी 'हेतू' दिसतात. उदा. अनादित्वात् – अनादि आहे म्हणून, निर्गुणत्वात् – निर्गुण आहे म्हणून इ.)

३. उदाहरण – जो सच्चिदानंदरूप असतो, तो परमात्म्याहून भिन्न नसतो. (फक्त परमात्माच सत् चित् आनंद आहे.)

४. उपनय – म्हणून –

५. निगमन – जीव ब्रह्मरूप आहे.

वैशेषिक व बौद्ध प्रत्यक्ष व अनुमान ही दोन प्रमाणे स्वीकारतात.

३) <u>शब्द प्रमाण </u>– यथार्थ बोलणाऱ्याच्या केवळ शब्दाने (कथनाने)ही ज्ञान होते. त्याचे शब्द – वाक्य 'शब्द प्रमाण' होत. त्यात प्रत्यक्ष किंवा अनुमान अजिबात नसते. जसे, आपल्या विश्वासू आप्ताने वा मित्राने आपल्याला सांगितले की 'तुम्ही अमुक परीक्षेत उत्तीर्ण झाला आहा', केवळ त्याच्या सांगण्यावरून आपण उत्तीर्ण झाल्याबद्दल आपला निश्चय होतो. याच प्रमाणाला आप्तवाक्य प्रमाण असेही म्हणतात.

येथे शब्द म्हणजे वेदाचा शब्द – वेदवचन, श्रुती. वेदाला आगम असेही म्हणतात. म्हणून शब्द प्रमाण या अर्थाने आगम प्रमाण हाही अर्थ समजला जातो.

सांख्य व योग दर्शने तीन प्रमाणे मानतात

४) <u>उपमान</u> – ज्ञात वस्तूच्या ज्ञानाच्या आधारे तिच्याशी सादृश्य असलेल्या दुसऱ्या अज्ञात वस्तूला ओळखणे हे या प्रमाणाचे स्वरूप आहे. उदा. कोण्या एकाने गवय हा पशू पाहिलेला नाही परंतु गाय पाहिली आहे. त्याला एखाद्याने सांगितले की, गवय गाईसारखा असतो. एवढ्या माहितीच्या आधारावर तो वनात गवय ओळखू शकतो. तथापि ब्रह्मासारखे दुसरे काहीच नसल्याने त्या ज्ञानासाठी कसलीही उपमा देता येत नाही. म्हणून ब्रह्मज्ञानासाठी उपमान प्रमाणाचा उपयोग नाही.

न्यायमत चार प्रमाणे मानते.

५) <u>अर्थापत्ती</u> – एखाद्या क्रियेचा (वा कारणाचा) परिणाम काय होतो हे निश्चितपणे अनुभवलेले असेल तर तसा परिणाम दिसल्याबरोबर त्याच्या कारणरूप क्रियेचा (कारणाचा) अंदाज बांधता येतो. वास्तविक ती कारणरूप क्रिया प्रत्यक्ष पाहिलेली नसते, पण अंदाज खरा ठरतो.

उदा. जेवण्याने पुष्टी व तुष्टी लाभतात हे माहीत आहे. एक व्यक्ती दिवसा जेवताना कधी दिसत नाही, पण पुष्ट आहे व तुष्टही आहे. तिच्या पुष्टी व तुष्टी या परिणामावरून ती रात्री जेवत असावी असा अंदाज येतो व तो खराही निघतो. असा कोणताच अंदाज ब्रह्माविषयी बांधता येत नाही. कारण ब्रह्म हे कोणाचे कार्य नाही किंवा कारणही नाही. ते निर्विकार आहे.

पूर्वमीमांसेचे प्रभाकर मतवादी पाच प्रमाणे मानतात.

६) <u>अनुपलब्धी</u> – एखाद्या वस्तूचा एखाद्या ठिकाणी अभाव जाणण्यासाठी ती वस्तू त्या ठिकाणी उपलब्ध नसली पाहिजे. म्हणजेच तिच्या अनुपलब्धीमुळे तिचा अभाव कळतो. अभावाच्या ज्ञानासाठी अनुपलब्धी हे कारण आहे म्हणूनच अनुपलब्धी हे प्रमाण आहे. जसे, येथे घटाचा अभाव आहे हे कळण्यासाठी तेथे घट उपलब्ध नसणे जरूर आहे.

ब्रह्म सर्वत्र सदा सम आहे. त्याचा अभाव कोणत्याच काळी वा कोणत्याच स्थळी नाही.

पूर्वमीमांसा भाट्टमत सहा प्रमाणे मानते .

७) <u>शक्य</u> – एखादी गोष्ट जर उपलब्ध असली तर तिचा अंशही तेथे उपलब्ध असणे शक्य आहे. उदा. एखाद्याच्या खिशात जर पन्नास रुपये असतील, तर त्याच्या खिशात दहा रुपये असणे शक्य आहे. ब्रह्मात अंश-अंशी भाव नसल्याने, ब्रह्माचे भाग पाडता येत नसल्याने हे प्रमाण तेथे उपयोगी नाही.

८) <u>ऐतिह्य</u> – एखादी गोष्ट कधीतरी कोणीतरी पाहिलेली असते व तसे तो सांगतो. नंतर परंपरेने ते पुढे चालत येते – असे असे आहे. उदा. वडाच्या झाडावर कोणाला भूत दिसल्यासारखे वाटले आणि पुढच्या पिढीपर्यंत सर्वच मानू लागले की त्या झाडावर भूत आहे. ब्रह्म 'असे असे पाहिले' असे कोणी पाहिले असणे शक्य नाही त्यामुळे या पद्धतीनेही ते ज्ञान होत नाही.

९) <u>चेष्टा</u> – येथे शब्दाचे काम नसते. शब्दात न सांगताही खुणेने एखादे ज्ञान देता येते. जसे पदार्थ चांगला झाल्याचे केवळ तर्जनी व अंगठा यांचा गोल करून हात हालविला तरी कळते. ब्रह्म अशा प्रकारे खुणेचा विषय होऊ शकत नाही.

वेदान्त मत ही सर्वच प्रमाणे स्वीकारते.

**प्रमेय –**

बाह्यवस्तूज्ञानात ज्या पदार्थाचे ज्ञान करून घ्यावयाचे त्याला प्रमेय म्हणतात. प्रमेय म्हणजे

सिद्धान्त.

**प्रसंख्यान –**

वृत्तीचा प्रवाह, ध्यान, उपासना. थोडक्यात निदिध्यासन.

**समानाधिकरण (सामानाधिकरण्य) –**

दोन नामे किंवा दोन सर्वनामे किंवा एक नाम व एक सर्वनाम यांचे एक विभक्तितत्त्व म्हणजे त्या दोन्हीची विभक्ति एकच असणे या गुणधर्माला समानाधिकरण म्हणतात. जसे, राम राजा आहे, या वाक्यात राम व राजा या दोन्ही नामांची प्रथमा ही एकच विभक्ति आहे. म्हणून राम व राजा यांचे समानाधिकरण आहे. दोन पदांचे समानाधिकरण असण्यासाठी त्यांचे अधिष्ठान एकच असणे ही अट आहे. येथे जो व्यक्ती राम आहे तीच राजा आहे. याप्रमाणे दोन्हीतील व्यक्ती समान आहे. किंवा जो राम तोच राजा व जो राजा तोच राम असे त्यांचे ऐक्य आहे. समानाधिकरण नेहमी ऐक्य सुचविते. समानाधिकरण या गुणधर्मामुळे या दोन्हीतील संबंधाला सामानाधिकरण्य हे नाव आहे. समानाधिकरणाचे दोन प्रकार आहेत.

१) <u>मुख्य समानाधिकरण</u> – एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूशी जेव्हा सदा (सिद्ध) अभेद असतो तेव्हा त्या दोन वस्तूत मुख्य समानाधिकरण असते. उदा. – घटाकाश व महाकाश. या दोन्हीतील अभेद सिद्ध करावा लागत नाही. तो नित्य सिद्ध आहेच. म्हणून त्यांचे मुख्य समानाधिकरण आहे. ब्रह्म व कूटस्थ यांच्यात मुख्य समानाधिकरण आहे.

<u>बाधसमानाधिकरण</u> – दोन पदांची विभक्ति एकच असते परंतु त्यांची सत्ता व स्वरूपे भिन्न असतात. अश्या परिस्थितीत त्यांच्यातील विरुद्ध अंशांचा बाध केल्यास त्यातील अविरुद्ध अंशांचा अभेद राहतो. याप्रमाणे बाध केल्यानंतर समानाधिकरण सिद्ध होते. म्हणून हे बाध समानाधिकरण होय. ब्रह्म व जीव यांच्यात बाध समानाधिकरण आहे.

**जीवस्वरूप व सृष्टिउत्पत्तीविषयक भिन्न वाद (मते) –**

फक्त ब्रह्म आहे. सृष्टी किंवा जीव म्हणून काही पदार्थच नाही हे सत्य आहे. पण सर्वांना सृष्टी सत्य आहे असे वाटते. म्हणून दिसणाऱ्या सृष्टीची व्यवस्था लावण्यासाठी शास्त्रकारांनी काही प्रक्रिया बसवून दिल्या आहेत. त्यांच्या सहाय्याने दिसणाऱ्या सृष्टीकडून एकमेव अद्वितीय ब्रह्मापर्यंत पोहोचावे. या प्रक्रिया शंभराच्या वर आहेत. त्यातील काही मुख्य प्रक्रिया –

<u>आरंभवाद</u> – आरंभ उपादान कारणावर ही प्रक्रिया अवलंबून आहे. कारणाच्या स्वरूपात बदल होत नाही पण भिन्न रूप कार्य घडते. या परिस्थितीत ते कारण त्या कार्याचे आरंभ उपादान असते. तंतूत

बदल न होता पट हे भिन्न स्वरूपाचे कार्य उत्पन्न होते. पटाचे आरंभ उपादानकारण तंतू. या प्रमाणे ब्रह्मापासून जग उत्पन्न झाले व ते सत्य आहे. पूर्वमीमांसा, न्याय व वैशेषिक मतानुयायी हा वाद मानतात.

परिणामवाद – परिणाम उपादानावर ही प्रक्रिया आहे. कार्य घडताना उपादान कारणाच्या स्वरूपात बदल होतो. त्यापासून अन्यथारूप कार्य होते. तेव्हा ते कारण त्या कार्याचे परिणाम उपादान कारण असते. दूध या कारणात बदल होऊन दही हे अन्यथारूप कार्य घडते. दह्याचे परिणाम उपादान कारण दूध. या प्रकारात कारण व कार्य यांचे स्वभाव म्हणजे सत्ता समान. दोन्ही व्यावहारिक सत्तेत. यानुसार ब्रह्म परिणाम पावून जग झाले. सांख्य व योग या मताचा स्वीकार करतात.

दृष्टि-सृष्टिवाद – जेव्हा पदार्थाचा (जगाचा) अनुभव येतो तेव्हाच तो उत्पन्न होतो. त्याचे अज्ञान असते तेव्हा तो नसतोच. दृष्टी = वृत्तिज्ञान. जेव्हा वृत्तिज्ञान (दृष्टी) तेव्हा सृष्टी. ती प्रतीतिमात्र आहे.

सृष्टि-दृष्टिवाद – सृष्टी अस्तित्वात आहे म्हणून दृष्टीला दिसते. सृष्टी उत्पन्न झाली आहे म्हणून तिचे ज्ञान होते.

विवर्तवाद – एक पदार्थ त्याहून विपरीत स्वभाववान व अन्यथारूप भासणे याला विवर्त म्हणतात. तो एक पदार्थ अधिष्ठान होय व अन्यथारूप पदार्थ अधिष्ठानाचा विवर्त. या ठिकाणी अधिष्ठान जसे आहे तसे प्रतीत होत नाही. भलत्याच रूपाने भासण्याचे कारण अधिष्ठानाबद्दलचे अज्ञान. रज्जू हे अधिष्ठान (व्यावहारिक सत्य) सर्प (प्रातिभासिक) या विपरीत स्वभावाच्या रूपाने दिसते. रज्जूज्ञानाने सर्प निवृत्त होतो. रज्जूवर असा सर्पभ्रम कशामुळे? तर रज्जूबद्दलच्या अज्ञानामुळेच. अर्थात विवर्ताला कारण मायाच (अज्ञान). अधिष्ठान चैतन्याच्या अज्ञानामुळे जगत्भ्रम झाला आहे. जग हा चैतन्याचा विवर्त व हे चैतन्य जगाचे विवर्तोपादानकारण होय. विवर्त म्हणजे अध्यासच. विवर्तात अधिष्ठान सत्य व अध्यस्त मिथ्या असते.

बिंब-प्रतिबिंबवाद – आरशात जसा मूळ पदार्थाचे प्रतिबिंबरूप दुसरा पदार्थ दिसतो, तसा जीव हे ब्रह्माचे प्रतिबिंब आहे.

आभासवाद – कूटस्थ, व्यष्टी अज्ञान किंवा सत्त्वप्रधान अंत:करण व कूटस्थाचे त्यात (विशेषाने बुद्धीत) पडलेले प्रतिबिंब म्हणजे आभास हे तीन मिळून जीव आणि ब्रह्म, शुद्धसत्त्वगुण माया व ब्रह्माचे त्या मायेत पडलेले प्रतिबिंब म्हणजे ईश्वर. येथे प्रतिबिंब या शब्दाचा अर्थ त्या स्वच्छ पदार्थात फाकलेला प्रकाश उर्फ आभास असा आहे. स्फटिकाच्या शेजारी दिवा ठेवल्यास स्फटिकाच्या आत प्रकाश फाकतो. यालाच चिदाभास म्हणतात. जीवत्व व कर्तृत्व आभासाच्यामुळे येते.

अवच्छेदवाद – कूटस्थ किंवा व्यष्टिअज्ञानोपहित चैतन्य (अंत:करणोपहित चैतन्य) व सत्त्वप्रधान अंत:करण म्हणजे जीव आणि मायोपाधिक ब्रह्म व माया मिळून ईश्वर. या वादात आभास मानलेला

नाही. जीवत्व येण्यास केवळ अवच्छेद – वेगळे पडणे पुरेसे आहे असे हे मत आहे.
कल्पनाकारणवाद – जग संकल्पामुळे निर्माण झाले असल्याने केवळ संकल्पमात्र म्हणजे कल्पनेचे झालेले आहे. सत् व असत् इ. सर्वच कल्पनेचे आहे.
स्वभाववाद – स्वयमेव भवतीति भाव:। स्वस्य भाव: स्वभाव:। जगत् कारणावाचून स्वभावत:च उत्पन्न होते. निर्माण होणे हा स्वभावच आहे.
मायावाद – श्रीमदाद्यशंकराचार्यांनी दिसणाऱ्या जगाची संगती लावण्यासाठी त्रिगुणगुणवती मायेचा पुरस्कार केला. मायेत शुद्धसत्त्वगुण आहे. माया या उपाधीने युक्त ब्रह्म ते सोपाधिक ब्रह्म म्हणजे ईश्वर, तोच मायी होय. ईश्वराने सृष्टी केली. 'अस्मान्मायी सृजत।' अशी श्रुती. निर्मितीचा क्रम 'आत्मन: आकाश: संभूत: ....।' इ. (तैत्ति.) या मायेचे अज्ञान हेच रूप. अधिष्ठान चैतन्याचे अज्ञान स्वत:च दोन प्रकारचे आहे. 'माया चाविद्याच स्वयमेव भवति। जीवेशावाभासेन करोति।' मायेच्या उपाधीने ईश्वर, अविद्येमुळे जीव. 'स ईक्षत।' या श्रुतीच्या आधारे ईश्वर सृष्टीचा निमित्तकारण झाला व 'एकोऽहं बहुस्याम्।' या श्रुत्याधारे उपादान कारण झाला असे ठरते. माया निमित्ताने ब्रह्मच जगाचे निमित्तोपादानकारण होय. ही माया जगाचे परिणाम उपादान होय. 'यतो वा इमानि भूतानि जायन्ते..।' ही श्रुती यास प्रमाण.
अजातवाद – नित्य-शुद्ध-अक्रिय, असंग, निर्विकार, सच्चिदानंद, सर्वभेदशून्य, सर्वपरिच्छेदशून्य, एकमेवाद्वितीय ब्रह्माचे ठिकाणी तद्विलक्षण जग (प्रपंच) कालत्रयी नाही (नव्हते, नाही, नसेल). जीव, ईश्वर, जग यांचा ब्रह्मस्वरूपी अत्यंत अभाव आहे. वेदान्ती हे मत मानतात. हे वेदान्ताभ्यासात उत्तुंग वैचारिक उंची दर्शविते.
सर्वब्रह्मवाद – सर्वं खलु इदं ब्रह्म – हे जे काही सर्व आहे ते ब्रह्मच आहे.
चिद्विलासवाद – जगत् म्हणजे चित् चा विलास आहे. चित् जगाच्या रूपाने दिसते.
(शेवटचे दोन्हीही अनुभवावयाची गोष्ट आहे. साधनेसाठी हे वाद उपयोगी नाहीत.)

कोणत्याही वादाचा उपयोग करावा. त्यानुसार विचार करावा व त्या आधारे जीवब्रह्मैक्य निश्चय करावा. वादांच्या वादात पडू नये.

**पद (शब्द)वृत्ती –**

तीन प्रकारच्या शब्दवृत्ती आहेत. १) शक्तिवृत्ती २) लक्षणावृत्ती ३) व्यंजनावृत्ती
१) शक्तिवृत्ती – पद व त्याचा अर्थ यांचा संबंध आहे. त्या संबंधास पदाची शक्तिवृत्ती म्हणतात. त्या त्या शब्दात आपल्या अर्थाचे ज्ञान करून देण्याची शक्ती आहे. यालाच सामर्थ्य किंवा बल असेही म्हणतात. वाक्य ऐकल्यावर त्यांतील पदांच्या शक्यार्थाचे प्रथम ज्ञान होते व त्या ज्ञानावरून वाक्याचा अर्थ कळतो. साधारणपणे हाच त्या पदाचा लक्ष्यार्थही असतो.

अ) अभिधावृत्ती – शब्दाच्या मुख्य अर्थास अभिधावृत्ती म्हणतात. यामुळे शब्दवृत्तीसही अभिधावृत्ती म्हणतात. अभिधा म्हणजे अर्थबोधक शब्दशक्ती, मूळचा अर्थ. उदा. 'मी' हा शब्द आत्मवाचक आहे म्हणजे तो कूटस्थाचे ज्ञान करून देतो हा त्याचा मुख्य अर्थ आहे. पदाचा वाच्यार्थ.

ब) गौणीवृत्ती – व्यवहारात अधिकतर वापरण्यात येणारा पण मुख्य अर्थाहून वेगळा असणारा अर्थ. 'मी' हा शब्द शरीर, अंत:करण, जीव इत्यादी प्रकारे वेगवेगळ्या वेळी वापरण्यात येतो. हा त्याचा गौण अर्थ आहे.

काही ठिकाणी मुख्य व गौणी वृत्ती हे शब्द याच्या अगदी उलट अर्थाने वापरलेले दिसतात. उदा. व्यवहारात अधिकतेने वापरण्यात येणारा तो मुख्य अर्थ व खरा अर्थ हा गौण अर्थ. कारण तो अनेकांना माहित नसतो.

<u>लक्षणावृत्ती</u> – पदाच्या शक्तीने याच्या शक्यार्थाचे ज्ञान होते पण तो अर्थ जर जुळत नसेल तर अर्थ जुळवून घ्यावा लागतो. याला लक्ष्यार्थ किंवा लक्षणा वापरून लावलेला अर्थ म्हणतात. याचे विवरण ग्रंथात आले आहे.

<u>व्यंजनावृत्ती</u> – छद्मी, तिरकस वाक्य. वरकरणी स्तुती वाटली तरी ती निंदा असते. जसे एखाद्या मूर्खाला 'फारच शहाणा आहेस' असे म्हणले तर त्याचा अर्थ 'मूर्ख आहेस' हा होतो.

**साक्षी** –

कूटस्थावर जेव्हा ज्ञातेपणाचा आरोप होतो, तेव्हा त्याला साक्षी म्हणतात. येथे अलिप्तपणा, निर्विकारता कळून येते.

**साक्षीभास्य** –

पाहा – प्रमा.

***